# हे अटकसत्र कुणाच्या इशाऱ्यावर सुरू आहे?

संपादकीय
जयश्री खाडिलकर-पांडेकृत

आम्ही प्रारंभीच एक बाब स्पष्ट करतो. आम्ही सनातन संस्थेच्या आणि माओवाद्यांच्या बाजूनी नाही आणि विरोधातही नाही. गेले दोन आठवडे विशेष पोलीस पथक आणि सीबीआयने जे अटकसत्र चालविले आहे त्याबद्दल आम्हाला शंका येते. अटक करण्याच्या घटनांची एकूणच कार्यपद्धती पाहिली तर यामागे नियोजन दिसते. त्यामुळे अटक केलेल्यांचे सूत्रधार सापडणे जितके महत्त्वाचे आहे तितकेच अटकसत्राचे नियोजन कुणी केले आहे हेही जाणणे गरजेचे आहे.

डॉ.दाभोळकर, गोविंद पानसरे आदि व्यक्तींच्या जयंतीला वा पुण्यतिथीलाच कुणालातरी अटक होते. तो दिवस गेला की वर्षभर एकही अटक होत नाही. ज्यांना अटक झाली त्यांच्यावर केलेले आरोप सिद्ध होत नाही, परंतु ते सर्वजण चौकशीसाठी गजाआडच राहतात. हा मधला प्रवास जनतेपुढे येत नाही. कोणतीही प्रसारमाध्यमे या प्रवासाचा छडा लावायला जात नाहीत आणि पोलीस, विशेष पोलीस पथकं किंवा सीबीआय या यंत्रणा माहिती देत नसल्याने या मधल्या प्रवासाची माहिती जनतेला मिळत नाही. जनतेपुढे फक्त जयंती वा पुण्यतिथीला झालेली अटक हे वृत्त राहते आणि मग ही घटना पुढच्या वर्षीपर्यंत विस्मृतीत जाते.

यावेळीही तेच झाले. डॉ.दाभोळकरांच्या पुण्यतिथीला नव्याने अटकसत्र सुरू झाले. एक पत्रकार म्हणून हे अटकसत्र विलक्षण वाटते. साधारणपणे कोणताही गुन्हा घडला असेल तर पत्रकारांना त्याची माहिती देण्यास पोलीस टाळाटाळ करतात. अगदी ओळखीचा पोलीस असला तरी माहिती मिळणे अशक्यच असते. आम्ही माहिती दिली तर तपासात व्यत्यय येईल असे पोलिसांचे म्हणणे असते. परिणामी अटक झाल्यावर अनेकदा अंदाज बांधून वृत्तांकन होत असते. पण यावेळी मात्र प्रत्येक अटक होण्यापूर्वीच पत्रकारांना व्यक्तीचे नांव, गांव, पत्ता, फोटो, त्याच्यावरील आरोप याची पूर्ण माहिती मिळत होती. ही माहिती मिळत होती म्हणजे पोलिसांकडून दिली जात होती. एखाद्याला ताब्यात घेऊन त्याची चौकशी करीत अटक होण्याच्या दोन तास आधी सर्व वाहिन्यांवर त्याचा इतिहासच झळकत होता. चिखले गावी आरोपींनी बंदुक चालवायचा सराव केला ही बातमी फुटण्यापूर्वी पत्रकारांनी चिखले गावचे चित्रीकरण पूर्ण केले होते. पोलीस आणि पत्रकार यांची इतकी मैत्री पहिल्यांदाच दिसली. अटक केलेल्यांची नांवे, त्यांचा इतिहास जगजाहीर करण्याची इतकी घाई का होत होती? हा वेग एवढ्यावर थांबला नाही. अटक केलेल्यावर कोणते आरोप आहेत हे अर्ध्या तासात वाहिन्यांवर झळकत होते आणि मग तासाभरात त्याने कोणता कबुलीजबाब दिला त्याची चक्क ब्रेकींग न्यूज येत होती. गेले आठवडाभर रोज सकाळी या प्रकरणाची एक ब्रेकिंग न्यूज प्रसारित होत होती. याचे तीन अर्थ आहेत. पत्रकार आपल्या कामात अति तरबेज झाले आहेत, पोलीस बेपर्वा बकबक करून माहिती देत आहेत किंवा ही माहिती प्रसारित करण्याचे हेतूपूर्वक नियोजन असल्याने पत्रकारांपर्यंत बरोबर वृत्त पोचवली जात होती. एकूण घडामोडी पाहता कोणत्यातरी हेतूने नियोजनपूर्वक पत्रकारांपर्यंत माहिती पोचवली जात होती.

विशेष पोलीस पथकाने टाकलेल्या धाडींनी तर आम्ही थक्कच झालो. सचिन अंदुरेच्या घरावर धाड टाकून बॉम्ब मिळाले, त्याच अंदुरेच्या घरावर दुसऱ्या दिवशी धाड टाकली तर आणखी आक्षेपार्ह वस्तू मिळाल्या. हे कसे शक्य आहे? अंदुरेच्या घरावर पहिली धाड पडली तेव्हा पोलिसांना सर्व वस्तू मिळाल्या नाहीत. पोलीस गेल्यावर अंदुरेचे कुटुंब आराम करीत बसले होते. दुसरी धाड येईपर्यंत त्यांनी उर्वरित आक्षेपार्ह वस्तू तशाच घरात ठेवल्या. त्या वस्तूंची विल्हेवाट लावली नाही. याहून भयानक म्हणजे सचिन अंदुरेला अटक झाल्याचे वृत्त दोन दिवस प्रत्येक वाहिनीवर भडकपणे दाखविल्यावर त्याचे दोन्ही मेहुणे झोपून राहिले. त्यामुळे तिसऱ्या दिवशी पोलिसांनी मेव्हण्यांच्या घरावर धाड टाकली.तेव्हा पोलिसांना हत्येसाठी वापरलेले पिस्तूल त्यांच्या घरात सापडले. म्हणजे सचिन अंदुरेला अटक झाल्यानंतरही मेव्हण्यांनी हत्येसाठी वापरलेले पिस्तूल घरातच ठेवले होते.

आता पंतप्रधान मोदींच्या हत्येचा कट रचला म्हणतात. त्या प्रकरणात माओवादी म्हणून एकाला अटक केली त्याच्या घरात पत्र सापडले. मोदींच्या हत्येच्या कटाचा उल्लेख करून हे काम तडीस न्यायला ७२ कोटी लागतील असा उल्लेख त्या पत्रात आहे. असे हे अति महत्त्वाचे पत्र सीबीआयला धाडीत सहज मिळेल असे ठेवण्यात आले हे पहिले आश्चर्य आणि दुसरे म्हणजे कटाची माहिती अशी व्यवस्थित लिहून पाठवणे ही न पटणारी बाब आहे. यामुळेच या दोन्ही अटकसत्रांबद्दल संशय निर्माण होतो. हे अटकसत्र सत्य आहे म्हटले तर अटक झालेले सर्वजण अतिशय मूर्ख आहेत किंवा अति आत्मविश्वासी आहेत. ते मूर्ख आहेत असे गृहित धरले तर हत्या होऊन किंवा कट रचून पाच वर्षे त्याचा सुगावाही लागला नाही असा कट रचणारे मूर्ख कसे असतील? ते अति आत्मविश्वासी असल्याने आपण पकडलोच जाणार नाही या विश्वासाने बिनधास्त राहिले असे गृहित धरले तरी पहिली अटक झाल्यावर इतर सतर्क होणार नाहीत का?

यामुळेच हे अटकसत्र संशयास्पद आहे. हत्यांचा सूत्रधार शोधणे जसे महत्त्वाचे आहे तसेच या अटकसत्राच्या नियोजनाचा सूत्रधार शोधणेही महत्त्वाचे आहे. कारण हे दोन्ही सूत्रधार लोकशाहीला घातक आहेत.